# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३५५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/०७/२०१८

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद –**

दिनांक १०/०७/०१८ चे १२.०० ते १२.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने तंटामुक्त समीतीची मिटींग सुरू असतांना सर्वासमोर फिर्यादीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(ब),५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल अपघातात एकाचा मृत्यु व एक जखमी : –**

दिनांक १०/०७/०१८ चे १८.३० ते १९.०० वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक उमेश वामन मलोडे वय ४५ वर्ष रा. नवरगाव हा त्यांचे मोटार सायकलने जात असता आपले मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रोडनी पायी जाणाऱ्या इसमाला त्यांचे मोटार सायकलला धडक लागल्याने पायी जाणारा इसम जखमी होवुन आरोपीच्या मोटार सायकल वरील संतुलन बिघडल्याने जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी भैय्याजी तुळसीराम मलोडे वय ४५ वर्ष रा. नवरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मंडलवार पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) विजेची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक २/०७/०१८ पुर्वी पासुन यातील फिर्यादी यांनी घटनास्थळी भेट दिली असता, कोणीतरी अज्ञात ईसमाने बजरंग व्यायाम शाळा शुक्रवारी पेठ राजेंद्र वार्ड भंडारा येथे महावितरण कंपनीच्या मालकीचा असणाऱ्या लघु दाब वाहीनीवर आकडा टाकुन विज चोरी करून विज जोड भार १.७७२ कि.वॅ. आढळुन आला व त्यामुळे कंपनीचा एकुण ९,७५४/रु. चे नुकसान झाले आहे व ११७६ युनिट ची चोरी झाली असल्याने फिर्यादी अशोक स्वामीनाथ ओझा वय ५० वर्ष अतिरिक्त कार्यकारी अभिंयता फिरते पथक म.रा.वि. वि.म. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) विजेची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद : –**

दिनांक १३/०६/०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी ग्राहक क्रं. ४३६०५०७२०३८३ या विदयुत मिटरच्या ऑउट–गोंईग फेज व न्युट्रल टर्मिनलच्या काळया रंगाची वायर मिटरच्या ईनकमींग फेज व न्युट्रल टर्मिनलमध्ये डायरेक्ट टाकुन मिटर बायपास करून विज चोरी करून म.रा.वि.वि. कंपनीची ३१५० युनीटची चोरी केल्याने ३६,१५९/रु. चे नुकसान झाल्याने घटनास्थळ पंचनामा व फिर्यादी अशोक स्वामीनाथ ओझा वय ५० वर्ष अतिरिक्त कार्यकारी अभिंयता फिरते पथक म.रा.वि.वि.म. भंडारा यांचे लखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १३५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) मोटार सायलच्या डिक्कीमधुन नगदी पैसे व पासबुक व अन्य कागदपत्राची चोरी : –**

दिनांक १०/०७/०१८ चे १३.३० ते १४.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा बॅक ऑफ इंडीया तुमसर येथील त्याचे खात्यातील ४५,०००/रु. विड्राल करून पॉलीथीन मध्ये विड्राल केलेली रक्कम, पास बुक व इतर कागदपत्रे काढुन पॉलीथीन घेवुन बॅक बाहेर जावुन मोटार सायकलने जाण्यास निघला असता मोटार सायकल पंन्चर झाल्याने विड्राल झालेली रक्कम व कागदपत्रे मोटार सायकचे डिक्की मध्ये टाकुन ढकलत–ढकलत मोटार सायकलला घटणा स्थळापर्यत जावुन फ्रेन्ड बॅकेत पैसे भरायचे असल्याने डिक्कीतील नगदी ४५,०००/रु. दिसुन आले नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी सुनिल तेजराम ठवकर वय २९ वर्ष रा. खापा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. उबाडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) ट्रॅक्टरचा लोखंडी हॅरो (पटलर) ची चोरी**

दिनांक ०९/०७/०१८ चे २१.०० ते दि. १०/०७/२०१८ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संजय ईश्वरदयाल पटले वय ३२ वर्ष रा. पिपरी चुन्नी हे त्याचे शेतात धानाचा परा लावण्याकरीता चिखल करून ट्रॅक्टरचा हॅरो (पटलर ) शेतात काढुन ठेवला असता; कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन लोंखंडी हॅरो (पटलर) कि. ८,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सेलोकर पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**७) सर्पद्वंशाने महिलेचा उपचारादरम्यान मृत्यु : –**

दिनांक १०/०७/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. रसिका प्रकाश हुमणे वय ४० वर्ष, रा. चपराड ही तिचे घरी बेडरूमध्ये सारवन करीत असता, डाव्या पायाच्या करंगळीजवळ विषारी सापाने चावल्याने तिला औषधोपचारा करीता ग्रामीण रूग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याने फिर्यादी दयाराम रामचंद्र मेश्राम वय ४८ वर्ष रा. चपराड यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**८) अवैध हातभट्टी /देशी दारू/ जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १०/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर, साकोल,लाखांदुर कारधा, करडी व लाखनी येथे अवैध हातभट्टी दारू देशी दारू /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २७ लिटर हातभट्टी दारू किंमती २,७००/–रु. ३ लिटर ६९० मिली लिटर देशी दारु किंमती २,८०४/–रु. तसेच जुगारातुन किंमती ४,०८२/–रु. असा एकुण किंमती ९,५८६/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १०/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवांसी – ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – ११९ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.